# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २७/०२/२०१७**

**सकाळी ११.३० वा.**

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दिनांक १०/०२/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. १०/०२/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह मंजूर करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २ | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील शुर्पारक मैदानाची तीन वर्षाकरीता देखभाल व व्यवस्थापन करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३ | प्रभाग समिती (ई) नालासोपारा पाणीपुरवठा विभागांतर्गत पेल्हार योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्र येथे जुन्या व नवीन पपिंग मध्ये ५० एच.पी. क्षमतेचे प्रत्येकी १ पंप, ५ एच.पी. क्षमतेचे २ व्हॅक्युम पंप, पॅनल बोर्ड नविन पुरविणे, बसविणे व इतर किरकोळ कामे करणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सादर. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद पेल्हार योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्र येथे जुन्या व नवीन पपिंग मध्ये ५० एच.पी. क्षमतेचे प्रत्येकी १ पंप, ५ एच.पी. क्षमतेचे २ व्हॅक्युम पंप, पॅनल बोर्ड नविन पुरविणे, बसविणे व इतर किरकोळ कामे करणे कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व याकामी जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन स्पर्धात्मक निविदा मागविणेंत याव्या व याकामी येणाऱ्या प्रसिध्दीच्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ४ | राष्ट्रीय महामार्ग क्र.८ नालासोपारा पूर्व नाला (छोटा पुल) ते गावराईपाडा नाका पर्यंत रस्ता रुंदीकरणात येणारी पेल्हार पाणी पुरवठा योजनेतील ४०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी ऐवजी नविन ४०० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी अंथरणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, सदर काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या उपलब्ध निधीतुन करावयाचे असल्याने एकूण खर्चानुसार उर्वरीत निधीची मागणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे तातडीने करावी. उपरोक्त नमुद कामांसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५५,०४,६५६/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत असून सदर कामासाठी यापूर्वी भांडार विभागामार्फत खरेदी करून<br>पाणीपुरवठा विभागाकडे उपलब्ध असलेले पाईप मंजूर वार्षिक ठेक्याच्या पॅनलवरील ठेकेदाराकडून अंथरुन घेण्यासाठी कार्यादेश देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच विषयांकित कामी यापूर्वी मागविण्यांत आलेली निविदा रद्द करून संबंधित ठेकेदार यांची इसारा रक्कम परत करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५ | वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी व्यक्तिगत विकासावर आधारीत कॅम्प आयोजित करणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी रक्कम रू. २,९८,०००/-इतक्या खर्चास व व्यक्तीमत्व विकासावर आधारीत कॅम्प राबविण्यासाठी मे. Touchbeam Foundation या संस्थेस ही सभा प्रशासकी व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६ | वसई विरार शहर महानगरपालिकेद्वारे नागरीकांना घरपट्टी कर व पाणीपट्टी कर भरण्याची Online सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी HDFC बँकेचा Payment Gateway चा प्रस्ताव मंजुर करणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार HDFC बँकेचा Payment Gateway चा प्रस्ताव करणेस आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७ | सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या व जखमी कुत्र्यांना | **ठराव :-** सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या व जखमी कुत्र्यांना पकडुन त्यांचेवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज प्रतिबंधक लस देणे कामी निविदा मागविण्यास व येणाऱ्या रक्कम रू. ५०,००,०००/- पर्यंतच्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. तथापि |

| | | |
|---|---|---|
| | पकडुन त्यांचेवर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करुन रॅबीज प्रतिबंधक लस देणे व जखमी कुत्र्यांवर औषध उपचार करणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. | पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मंजूर निविदाकार ॲनिमल फ्रेंडस पब्लिक वेल्फेअर सोसायटी ह्यासकडून मंजूर दराने भटक्या व जखमी कुत्र्यांना पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व रॅबिज प्रतिबंधक लस देणे काम करण्यास व त्याबाबतची वेळोवेळी येणारी बीले अदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समिर डबरे सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८ | प्रभाग समिती "बी" हद्दीतील नालासोपारा पुर्व येथील तुळींज विरार चौक ते तुळींज पोलिस चौकी पर्यंत रस्ता रूंदीकरणात येणारे एस.टी. पोल वाहिन्या हटविणे व भुमिगत केबलद्धारे एच.टी. वाहिन्या पुर्ण स्थितीत करणेकामी प्रशासकीय वित्तीय मान्यता मिळणेबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन म.रा.वि.वि. कंपनी कडील अंदाजपत्रकानुसार निविदा मागविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९ | ई-निविदा प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या Digital Signature Certificate बनविणे कामी संविदेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी रक्कम रू, ४८,०००/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १० | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती आय अंतर्गत येणारे मार्केट/बाजारपेठ सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता ठेका पध्दतीने देणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेंत आली. तरी सन २०१६-१७ च्या मंजूर रक्कमेवर १०% वाढ करून ५ मार्केट/बाजारपेठा करीता देकार रक्कम अनुक्रमे रक्कम रू. ५,०६,६१०/-, ६,३८,६१०/-, ६,७२,१००/-, १०,९९,९९८/-, २२,१०,९२३/- अशी निश्चित करून तसेच या बाजारांकरीता १५% दराने सेवाकर आकारून बाजार वसुलींच्या ई-निविदा मागविणेकामी व त्यांच्या सोबत कारनामा करणेंस ही सभा मंजूरी देत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | **अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील   सूचक :- मा.श्री. अफिफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११ | वसई विरार शहर महानगरपालिका नालासोपारा कार्यक्षेत्रातील निळेमोरे, सोपारा (अपंगासाठी आरक्षित) व वाघोली हद्दीतील बाजारकर सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता वार्षिक ठेका पध्दतीने देणेकामी ई-निविदा मागविणेबाबत. | **ठराव** :- सदर विषयाबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा केली असता प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील निळेमोरे, सोपारा व वाघोली हद्दीतील बाजारांपैकी सोपारा बाजार अपंग व्यक्तींना आरक्षित ठेऊन सदर बाजार वार्षिक ठेका पद्धतीने वसुलीस देणेस तसेच या बाजारांच्या मागील वर्षातील मंजुर रक्कमेवर १०% वाढ करुन सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी **निळेमोरे बाजारासाठी रक्कम रु. ३२,५२,९४७/-, सोपारा बाजारासाठी रक्कम रु. २८,१९,२८०/-** व **वाघोली बाजारासाठी रक्कम रु. ६,४६,८६६/-** निश्चित करणेंत येत असून सदर रक्कमेवर १५% दराने सेवा कर आकारुन बाजार कर वसुलीची ई-निविदा मागविणेस व वर्तमानपत्रात ई-जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करणेस तसेच ई- निविदा प्रसिध्दीमध्ये काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून मागील वर्षातील मंजुर निविदा धारकास सन २०१७-१८ साठी निश्चित करण्यात येत असलेल्या रक्कमेवर बाजार वसुलीचा आदेश देणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे   सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२ | वसई विरार शहर महानगरपालिका नालासोपारा कार्यक्षेत्रातील आचोळे हद्दीतील बाजारकर सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता वार्षिक ठेका पध्दतीने वसुलीस देणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा केली असता प्रस्तावित केल्याप्रमाणे आचोळे येथील बाजार कर वार्षिक ठेका पद्धतीने वसुलीस देणेकामी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात देण्यात आलेल्या मंजुर रक्कमेवर १०% वाढ करुन सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी रक्कम रु. ४२,२५,१००/- निश्चित करणेंत येत असून सदर रक्कमेवर १५% दराने सेवा कर आकारुन बाजार कर वसुलीची ई-निविदा मागविणेस व वर्तमानपत्रात ई-जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करणेस तसेच ई- निविदा प्रसिध्दीमध्ये काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास महानगरपालिकेचे<br>आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून मागील वर्षातील मंजुर निविदा धारकास सन २०१७-१८ साठी निश्चित करण्यात येत असलेल्या रक्कमेवर बाजार वसुलीचा आदेश देणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे   सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १३ | वसई विरार शहर महानगरपालिका नालासासोपारा कार्यक्षेत्रातील तुळींज हद्दीतील बाजारकर सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता वार्षिक ठेका पध्दतीने देणेबाबत. | **ठराव :-**सदर विषयाबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा केली असता प्रस्तावित केल्याप्रमाणे तुळींज येथील बाजार कर ठेका पद्धतीने वसुलीस देणेकामी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील मंजुर रक्कमेवर १० % वाढ करुन सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी रक्कम रु. **४७,५२,०००/-** निश्चित करणेंत येत असून सदर रक्कमेवर १५% दराने सेवा कर आकारुन बाजार कर वसुलीची ई-निविदा मागविणेस व वर्तमानपत्रात ई-जाहिर निविदा सुचना प्रसिद्ध करणेस तसेच ई- निविदा प्रसिद्धीमध्ये काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून मागील वर्षातील मंजुर निविदा धारकास सन २०१७-१८ साठी निश्चित करण्यात येत असलेल्या रक्कमेवर बाजार वसुलीचा आदेश देणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान कार्यक्रमांतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका वाढीव १०० द.ल.ली (सुर्या टप्पा-३) पाणी पुरवठा योजनेच्या कामास मुदत वाढ देण्यासंबधी मंजुरी मिळणे बाबत. | **ठराव :-** वनविभाग ठाणे, म.रा.वि.वि.कंपनी, राष्ट्रीय महामार्ग क्र.८ जी.प.पालघर, पाटबंधारे विभाग, पश्चिम रेल्वे इ. विभागाच्या परवानग्या प्राप्त करण्यास झालेला विलंब व त्याअनुषंगाने कामे पुर्ण करण्यास झालेला विलंब तसेच खाजगी भूधारकांकडून येणाऱ्या अडचणी याबाब लक्षात घेता ठेकेदाराने मागणी केल्यानुसार सल्लागार म.जी.प्रा. विभागाने केलेली शिफारस विचारात घेवून विषयांकीत कामी ठेकेदार मे.घारपुरे इंजिनिअरींग ॲण्डक कन्स्ट्रक्शन कंपनी, पुणे यांना ३१ मार्च, २०१७ पर्यंत निविदेतील सबवर्क्स क्र. २,४,५,६,७,८ व ९ यांना भाववाढ निर्देशांकाच्या फायद्यासह मुदतवाढ देणेस ही सभा मंजूरी देत आहे. तसेच याकामी पुढील आवश्यक कार्यवाहीचे अधिकारी आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना प्रदान करण्यांत येत आहेत.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनिल आचोळकर सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १५ | प्रभाग समिती 'ई' मध्ये वॉर्ड नं. ८४ भुईगाव आंबेडकर नगर येथे ४ सीटचे शौचालय बांधणेकामी कमी दराच्या निविदा धारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची मे.मधुराणी इंटरप्रायजेस यांची ५.००% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मे.मधुराणी इंटरप्रायजेस यांच्याषी कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १६ | नालासोपारा (प) वाघोली येथील स्मशानभुमी विकसीत करणेकामी कमी दराच्या निविदा धारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत.(मा.आ.श्री. हितेंद्रजी ठाकुर यांच्या फंडाअंतर्गत) ( सन २०१५-१६) | **ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ११ दि. १८/०६/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आलेली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे. शाहरूख खान यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) २.७५% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनयम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे, या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानरपालिका अधिनियम १९४९ के कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १७ | नालासोपारा (पूर्व) स.नं.२११ अंतर्गत बगीचा विकसीत करणेकामी कमी दराच्या निविदा धारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. ( मा.आमदार श्री. क्षितीजजी ठाकुर यांच्या फंडा अंतर्गत ) ( सन २०१५-१६). | **ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १० दि. १८/०६/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आलेली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे. आकाश एंटरप्रायजेस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) १२.९२% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनयम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे, या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानरपालिका अधिनियम २०११ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १८ | नालासोपारा (प) निर्मळ येथील स्मशानभुमी विकसीत करणेकामी कमी दराच्या निविदा धारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. (मा.आ.श्री. हितेंद्रजी ठाकुर यांच्या फंडा अंतर्गत) ( सन २०१५-१६). | **ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ११ दि. १८/०६/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आलेली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे. आकाश कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) १२.९२% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनयम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे, या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १९ | सन २०१६/१७ या वर्षात वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन मे. आफताब इन्फ्रा यांनी निविदेतील वाटाघाटीने कमी करून दिलेल्या सर्व दरांना मान्यता देण्यांत येत असून त्यांच्या बरोबर संविदा करण्यास मान्यता देण्यांत |

| | | |
|---|---|---|
| | आवश्यकतेनुसार टँकरद्धारे पाणी पुरवठा करणेकामी प्राप्त निविदा दरांपैकी लघुत्तम दराच्या निविदेस मान्यता व संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | येत आहे. तसेच याच कमी केलेल्या दराने निविदेत सहभाग घेवून पात्र असलेले इतर ठेकेदार याच कमी केलेल्या दराने काम करण्यास तयार असल्यास संमत्तीपत्र घेवून, करारनामा करून त्याची नियुक्ती पॅनलवर करण्यास मान्यता देण्यांत येत आहे तसेच गैरसोय होऊ नये म्हणून मागील वर्षाच्या ठेक्यातुन कामे सुरु ठेवण्यासाठी केलेल्या कार्यवाही, खर्चास तसेच सन २०१६/१७ च्या ठेक्याची मुदत माहे मार्च २०१८ पर्यंत ठेवण्यास या सभेची मान्यता आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २० | सन २०१६-१७, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ हया वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जमिनीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी सर्वेअरची नेमणुक करणेकामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करात मे. श्रध्दा लॅन्ड सर्वेअर व मे.राणे मॅनेजमेंट ह्यांची निविदा (वाटाघाटीनंतर) सर्वात कमी व वाजवी आहे. सदर कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर. सदर दराने निविदेमधील भाग घेतलेल्या अन्य निविदाधारक (सर्वेअर्स) काम करणेस इच्छुक असल्याची त्यांची पॅनलवर नियुक्ती करुन काम करुन घेणेकरीता दि. १३/१२/२०१६ रोजी पत्र देण्यांत आले होते. तरी सदर पत्रास अनुसरुन मे.श्रध्दा लॅन्ड सर्वेअर व मे.राणे मॅनेजमेंट ह्यांनी दि. १६/१२/२०१६ व दि. १५/१२/२०१६ रोजी आपल्या पत्राद्धारे सदरच्या दराने काम करणेची तयारी दर्शविली आहे व मे.पी.एन.शिंधोर यांनी आपल्या दि. २०/१२/२०१६ रोजीच्या पत्राद्धारे सदर दराने काम करणेस इच्छुक नसल्याचे कळविले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी महानगरपालिकेतर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे. याकामी होणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २१ | वसई-विरार शहर महानगरपालिका मालकीचे सर्व डिझेल जनत्रितांची देखभाल दुरुस्ती करणे व आवश्यक स्पेअर पार्ट ( साहित्य) फिटींग करणे कामाचे संविदा करणेबाबत. | **ठराव :-** वरील प्राप्त ई-निविदांमधील दरांची तुलनात्मक पडताळणी केली असता, तुलनात्मकरीत्या कमी असलेल्या काही दरांमध्ये दरांच्या वाटाघाटी करण्यांत आल्या. वाटाघाटीअंती मान्य केलेले दर हे योग्य व वाजवी आहेत. सदरचे दर हे सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता मागविण्यांत आलेले आहेत. परंतु सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाचा कालावधी हा कमी राहिलेला आहे. त्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये सर्वात कमी दराच्या ई-निविदांकारांसोबत माहे मार्च २०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी वाटाघाटीअंती |

| | | |
|---|---|---|
| | | कमी दराचे निविदाकाराबरोबर संविदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २२ | प्रभाग समिती “डी” आचोळे क्षेत्रातील मजेठीया स्टेज इमारतीचे नुतनीकरण करणेकामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेंस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सांगोपन चर्चा होवून उपरोक्त निविदांची तुलना करता कमी दराची मे हमीद जे. शेख यांची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी संविदा करणेसाठी ही सभा म.न.पा.च्या वतीने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २३ | किल्लाबंदर येथील विहीरीचे पाणी रिव्हर्स ऑसमॉसिस (१० मीटर ३ तास आर ओ) टेक्नॉलॉजीद्वारे शुध्दीकरण काम करणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. मे. ओम एंटरप्रायजेस यांच्या रक्कम रू. १७,९०,०००/- दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून मे.ओम.एंटरप्रायजेस यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समिर डबरे सूचक :- मा.श्री. अफिफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २४ | प्रभाग समिती “अ” मध्ये विरार (प) प्रभाग क्रमांक ३६ मध्ये बोळींज प्रभाग समिती कार्यालयाच्या तळमजल्यावरील कार्यालयाचे नुतनीकरण करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव** :- सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रू. १७,०५,१६०/-) या खर्चास ह सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| २५ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नोंदणीकृत जेष्ठ नागरीक संस्थांना वार्षिक अनुदान मंजूर करणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार, प्रस्तावातील नमुद समाज उन्नती मंडळ, माणिकपूर व गोकूळ टाऊनशिप जेष्ठ नागरीक मित्रमंडळ या जेष्ठ संस्थांना सन २०१६-१७ या वर्षाकरीता वार्षिक अनुदान प्रत्येकी रु. १ लक्ष असे एकूण रक्कम रु. २,००,०००/- (अक्षरी दोन लक्ष रुपये मात्र) देण्यांस ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २६ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (बी) मधील विरार (पू.) प्रभाग क्र. २१ मधील विजयानंद पार्क जवळ नाल्यावर स्लॅब टाकणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १२ दि. १७/०३/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्ट्या मे हमीद शेख यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) ४.९५% जादा दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आह<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २७ | वसई-विरार शहर महानगरपालिरा कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (बी) नालासोपारा (पू.) ओस्वाल नगरी येथे वाहतुक बेट सुशोभिकरण करणे कामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. (मा.आमदार क्षितीजजी ठाकूर यांच्या फंडाअंतर्गत (सन २०१५-१६) | **ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १० दि. १८/०६/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्ट्या मे नितीन गोपाळे यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) ४.७०% जादा दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे सूचक :- मा.श्री. अजीत नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २८ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जि. प. शाळेतील व अनाथ आश्रमातील मुलींना मासिक पाळीचे | **ठराव :-** महानगरपालिका हद्दीतील जि.प.शाळेत शिकत असलेल्या इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यींनींना तसेच महानगरपालिका हद्दीतील आदिवासी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शाळेतील व खाजगी आश्रम शाळेतील निवासी व अनिवासी मुलींना या योजनेचा लाभ देण्यात यावा. याकरिता व्हिसपर्स या मान्यता प्राप्त कंपनीच्या |

| | | |
|---|---|---|
| | पॅड (सॅनेटरी नॅपकिन) पुरवठा करणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकाराच्या दरास मंजूरी देवून संविदा करणेंस मंजूरी देणे. | (व्हिसपर्स चॉईस) या प्रकारच्या बाजार भावाप्रमाणे नॅपकिन पॅड वाटप करण्यात यावा. तसेच पॅकेटवर महानगरपालिकेचा लोगोसहित छापुन नॉट फॉर सेल असे नमुद करण्यात यावे. साहित्य वाटप करणेंकरीता प्रत्येक वेळी महापालिकेच्या वाहन विभागामार्फत वाहने व आरोग्य विभाग मार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात यावे याकरीता (व्हिसपर्स चॉईस) कंपनीचे सॅनेटरी नॅपकीन खरेदी<br>कामी प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दर रक्कम ३२.७५/- प्रति पॅकेट दरास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच सर्वात कमी दराचे निविदाकार में. हरजित कलेक्शन यांचे सोबत संविदा करण्यास मान्यता देण्यात येत असुन याकामी अंदाजे येणाऱ्या ३३,१२,०००/- खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २९ | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ११३ मधील एमएमआरडीअे शौचालय ते सुरूची बागेच्या मुख्य प्रवेशद्धारापर्यंतच्या रस्त्यास खडीकरण व डांबरीकरण करणे. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. वरील कामी तयार करणेंत आलेल्या रू. ७०,३०,९०६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेंस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. अफिफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |